# <u>प्रेसनोट</u>

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड  जा.क्रं.  35/2024  दिनांक : 24.01.2024

## 1)खुनाचा प्रयत्न :-

**नांदेड ग्रामीण :-** दिनांक 22.01.2024 रोजी चे 19.30 वा. चे सुमारास, **हनुमान मंदीराचे बाजुला जिंदमनगर गोपाळचावडी ता. जि. नांदेड येथे**, यातील फिर्यादी व त्याचा पुतण्या गणेश नारायण जाधव व पुतण्याचा मित्र प्रविण अवधुते असे गोपाळचावडी जिंदमनगर येथे हनुमान मंदीराचे बाजुला थांबलेले असतांना यातील नमुद तीन आरोपीतांनी संगणमत करून आरोपीतांनी मोटार सायकलला कट मारल्याने मोटार सायकल हळु चालव म्हणल्याने त्याचा राग मनात धरून आरोपी हे फिर्यादीचे पुतण्याला मारहाण करत असतांना फिर्यादी त्यांचे भाडण सोडवण्यासाठी गेला असतांना भांडण सोडवण्याचा राग मनात धरून फिर्यादीस हातातील खंजरने वार करून गंभीर जखमी करून खुन करण्याचा प्रयत्न केला. व लाथा बुक्याने मारहाण करून जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी संजय शिवाजी जाधव, वय 30 वर्षे, व्यवसाय खाजगी नौकरी रा. जिंदमनगर गोपाळचावडी ता. जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 57/2024 कलम 307, 323, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री जामोदकर, मो.क्रं. 9823236453** हे करीत आहेत.

## 2)जबरी चोरी :-

**वजिराबाद :-**दिनांक 22.01.2024 रोजी चे 18.30 वा. चे सुमारास, **गायत्री मंदीराचे खाली नंदीचे कडेला पायऱ्या जवळ महादेवाचे मंदीरात नांदेड येथे**, यातील फिर्यादी हा गायत्री मंदीराचे खाली नदीचे कडेला पायऱ्या जवळ महादेवाचे मंदीर नांदेड येथे पुजा करीत असतांना यातील अनोळखी तीन आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी सोबत झटापट करून फिर्यादी जवळील मोबाईल किंमती 8000/-रू चा व खिशातील नगदी 500/-रूपये बळजबरीने चोरून गल्लीत पळुन गेले. वगैरे **फिर्यादी राजु वामनराव गडमलवाड, वय 52 वर्षे, व्यवसाय हमाली रा. गायत्री मंदीर पांडे बाबा मार्ग जुना मोंढा नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं 35/2024 कलम 392, 323, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री केंद्रे, मो. नं. 9850827563** हे करीत आहेत.

## 3)घरफोडी :-

**कंधार :-** दिनांक 21.01.2024 रोजी 23.00 वा. चे सुमारास, **मौ. गुंटूर शिवारात ता. कंधार जि. नांदेड येथे**, यातील नमुद आरोपीने फिर्यादीचे शेतातील घरामध्ये ठेवलेला वीस गाठोडे कापुस प्रत्येक गाठोडयात 40 किलो अंदाजे किंमती 55,000/-रू चा माल घराचे कुलूप तोडुन आत प्रवेश करून पांढरे पिकअप आणुन चोरून नेला. वगैरे **फिर्यादी नामदेव किशन पवार, वय 55 वर्षे, व्यवसाय शेती रा. गुंटूर ता. कंधार जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे कंधार** गुरनं 23/2024 कलम 457, 380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2259 श्रीरामे, मो. नं. 9422336474** हे करीत आहेत.

## 4)अवैध रेती चोरी :-

**मनाठा :-** दिनांक 23.01.2024 रोजी चे 17.20 वा. चे सुमारास, **मौ. मनाठा येथील आदर्श माध्यमिक व उच्च माध्यमिक विदयालय समोर सार्वजनिक रोडवर ता. हदगांव जि. नांदेड येथे**, यातील ट्रॅक्टर चालक व मालक यांनी बिना परवाना बेकायदेशिररीत्या एक ब्रास वाळु किंमती 5,000/-रू ची एक स्वराज्य कंपणीचे ट्रॅक्टर किंमती 2,00,000/-रू च्या मध्ये चोरटी विक्री करण्याच्या उदेशाने वाहतुक करीत असतांना मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोकॉ/3001, संभाजी नारायण नरवाडे, ने. पोस्टे मनाठा** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मनाठा** गुरनं 09/2024 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री तुकडे, मो.क्रं. 9049508135** हे करीत आहेत.

## 5)विवाहीतेचा छळ :-

**कुंडलवाडी :-** दिनांक 28.07.2023 ते दिनांक 30.12.2023 चे 14.00 वा. चे दरम्यान, **असर्जन ह. मु. माष्टी ता. धर्माबाद जि. नांदेड येथे**, यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईचे चारीत्र्यावर संशय घेवुन शिवीगाळ करून मारहाण केली व घर घेण्यासाठी तुझे माहेरहून पाच लाख रूपये आण म्हणुन शारिरीक व मानसीक छळ करून घराबाहेर हाकलुन दिले. वगैरे **फिर्यादी 19 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे कुंडलवाडी** गुरनं 09/2024 कलम 498(अ),323,504,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2821 चव्हाण, मो.क्रं. 8805541745** हे करीत आहेत.

## 6)बालकामगार अधिनियम :—

**लिंबगाव** :— दिनांक 23.01.2024 रोजी चे 15.56 वा. चे सुमारास, **पुयणी शिवारातील मराठवाडा बेकरीमध्ये ता. जि. नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी संगणमत करून आपल्या पुयणी शिवारातील मराठवाडा बेकरीमध्ये महाराष्ट्र शासनाचे नियमांचे उल्लंघन करून 1)मोनु हरीलाल राजपुत, वय 15 वर्षे, रा. कनियवा सिध्दार्थ नगर 2)विश्न्नाल शिवकुमार गौतम, वय 12 वर्षे, 3)आकाश शिवकुमार गौतम, वय 16 वर्षे, 4)शिवप्रसाद बळीराम राजपुत, वय 16 वर्षे, सर्व रा. उत्तरप्रदेश राज्य यांचेकडुन बालकामगार म्हणुन काम करून घेवुन बेकायदेशिर कृत्य केले. वगैरे **फिर्यादी पोउपनि/श्री गंगाधर नामदेवराव गायकवाड, ने. दहशतवाद विरोधी शाखा नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे लिंबगाव** गुरनं 13/2024 कलम 374, 34 भादवी सह कलम 3, 14, बालकामगार अधिनियम 23, 26 बालन्याय संरक्षण कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/706 पवार, मो.क्रं. 9373545955** हे करीत आहेत.

## 7)भारतीय हत्यार कायदा :—

**मुदखेड** :—दिनांक 22.01.2024 रोजी चे 20.15 वा. चे सुमारास, **मुदखेड ते नांदेड रोडवर सीआरपीएफ व्हीआयपी गेट मुदखेड ता. मुदखेड जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकादेशीररीत्या आपले ताब्यात लोखंडी चाकु ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोकॉ/699 रमेश दादाराव पुणेबोईनवाड. ने पोस्टे मुदखेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुदखेड** गुरनं 05/2024 कलम 4/25 भारतीय हत्यार कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1375 ठाकुर, मो.क्रं. 7774051375** हे करीत आहेत.

## 8)गळफास घेवुन आत्महत्या :—

**नायगांव** :—दिनांक 23.01.2024 रोजी चे 08.00 वा. चे सुमारास, **सरकारी दवाखाना नायगांव ता. जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे बालाजी शिवाजी जाधव, वय 30 वर्षे, व्यवसाय शेती रा. खैरगाव ता. नायगांव जि. नांदेड**, यांनी शेतातील सतत नापीकीमुळे व एसबीआय बँक शाखा नायगांव कडुन घेतलेले कर्ज कसे फेडावे या सततच्या विचाराने त्यांनी त्यांच्या राहात्या घरी वरच्या मजल्यावर फॅनला दोरीच्या साहयाने गळफास घेऊन आत्महत्या केला. वगैरे **खबर देणार अशोक माधवराव जाधव, वय 55 वर्षे, व्यवसाय शेती रा. खैरगाव ता. नायगांव जि. नांदेड** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे नायगांव** आ. मृ. **02**/2024 कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/349 सांगवीकर, मो.नं. 7875643333** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड